# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:30.05.2026** **वार: शनिवार**

---

1. पुण्यात विषारी दारू प्यायल्याने 12 जणांचा मृत्यू; या प्रकरणी आतापर्यंत 8 जणांना अटक
2. महाराष्ट्र केवळ भारतातच नव्हे तर जगात एआयचं नेतृत्व करेल-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास
3. विधान परिषदेच्या 17 पैकी 15 जागांवर महाविकास आघाडीत सहमती
4. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या 150व्या तुकडीचं आज दीक्षांत संचलन आणि
5. यंदाच्या मान्सूनमध्ये सरासरीच्या 90 टक्के पावसाचा अंदाज

**विषारीदारू-मुख्यमंत्री**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात विषारी दारू प्यायल्यामुळे 12 जणांचा मृत्यू झाला आहे. पिंपरी-चिंचवड मधील दापोडी आणि फुगेवाडीमध्ये 9 जणांचा तर काळे पडळ आणि हडपसर परिसरात 5 जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या प्रकरणी पुणे आणि पिंपरी-चिंचवड पोलीस वेगानं तपास करत आहेत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. ते म्हणाले....

**माझं पोलीस आयुक्तांशी बोलणं झालेलं आहे. कुठल्या ठिकाणी हे तयार झालं आहे ते देखील त्यांनी शोधून काढलेलं आहे. त्याच्या पाठीमागे कोण कोण आहे हे देखील पोलीस शोधून काढता आहेत आठ लोकं अटक झाले अजून काही लोकं अटक होऊ शकतात. शंभर टक्के पूर्ण साखळी शोधून आणि त्यांच्यावर अतिशय कडक कारवाई केली जाईल कारण हा एक प्रकारे ही हत्याच आहे. त्यामुळे अतिशय कडक अशा प्रकारचे त्यांच्यावर कलम लावण्यात आले.**

या प्रकरणातील मुख्य आरोपी योगेश वानखेडे याच्यासह 8 जणांना अटक करण्यात आली आहे. वानखेडे याच्यावर यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल असल्याचं समजतं. या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन सखोल चौकशी करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी प्रशासनाला दिले आहेत.

**मुख्यमंत्री**

आगामी काळात महाराष्ट्र केवळ भारतातच नव्हे तर जगात एआयचं नेतृत्व करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. 'मुंबई टेक वीक 2026'चं उद्घाटन केल्यानंतर आयोजित मुलाखतीत ते काल बोलत होते. मुंबईच्या महापौर रितू तावडे, प्रशासकीय अधिकारी, उद्योजक, स्टार्टअप संस्थापक, गुंतवणूकदार आणि जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांचे प्रतिनिधी या वेळी उपस्थित होते. एआयचा वेगानं विस्तार होत असताना निर्माण होणाऱ्या 'डीपफेक', डेटा सुरक्षा या समस्यांबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, 'एथिकल एआय' हीच राज्याच्या धोरणाची मध्यवर्ती संकल्पना आहे.

## विधानपरिषद

विधान परिषदेच्या 17 जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीकरता महाविकास आघाडीचं 15 जागांवर एकमत झालं आहे. त्यानुसार काँग्रेस 8, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष 4, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष 3 जागा लढवणार आहे. याबाबत काल मुंबईत झालेल्या बैठकीनंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी ही माहिती दिली. उर्वरित दोन जागांवरही लवकरच निर्णय होईल, असं त्यांनी सांगितलं. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अनिल देसाई, आमदार अंबादास दानवे उपस्थित होते.

चंद्रपूर, यवतमाळ, भंडारा, अमरावती, अहिल्यानगर, सोलापूर, धाराशिव-लातूर-बीड, तसंच पोटनिवडणूक असणाऱ्या नागपूर मतदारसंघात काँग्रेस उमेदवार देणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष- पुणे, ठाणे, आणि सांगली-सातारा या 3 जागा, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष- रायगड, जळगाव, परभणी-हिंगोली, आणि छत्रपती संभाजीनगर या 4 जागा लढवत आहे, असं सपकाळ यांनी सांगितलं.

## नीट

नीट परीक्षेसारख्या प्रकरणात जबाबदारी निश्चित केली पाहिजे, असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. नीट पेपरफुटीनंतर दाखल झालेल्या याचिकांवर न्यायमूर्ती पी एस नरसिंहा आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या पीठासमोर काल सुनावणी सुरु झाली. वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा घेण्याकरता वेगळी मजबूत आणि स्वायत्त यंत्रणा तयार करावी किंवा सध्याच्या राष्ट्रीय परीक्षा संस्थेमधे आमूलाग्र बदल करावा, अशी मागणी यातल्या एका याचिकेत केली आहे. येत्या 21 जून रोजी नीट फेरपरीक्षा होणार असून त्यावेळी काही गैरप्रकार होऊ नयेत याकरता विशेष उपाययोजना केल्या आहेत, पंतप्रधान स्वतः या प्रक्रीयेवर लक्ष ठेवून आहेत असं महाअधिवक्ता तुषार महेता यांनी यावेळी सांगितलं.

## कोल्हापूर-आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

कोल्हापूर जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापनाचं प्रशिक्षण प्रथमच तृतीयपंथीयांच्या एका पथकाला दिलं जात आहे. जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. प्रसाद संकपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय स्तरावरचा हा अशा प्रकारचा पहिलाच नाविन्यपूर्ण प्रयोग आहे. ऐकुया याविषयी अधिक माहिती प्रसाद संकपाळ यांच्याकडून...

**या तृतीयपंथीयांकडं पुरुषाची ताकद का स्त्रीची कोमलता आणि तिचा इनोसेंट सुद्धा आहे हे त्याच्यामध्ये दिसून आलं. निश्चितच या गोष्टी बघत असताना असं लक्षात आलं की बाबा आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रामध्ये तृतीयपंथी लोक जे समाजाच्या मुख्य प्रवाहात नाहीयेत आणि फक्त भिक्षा मागणं किंवा शरीर विक्रय करणं ह्या दोनच गोष्टी त्या आजमितीला करतायत. त्यांना जर आपण या आपत्ती व्यवस्थापनाच्या कार्यामध्ये सहभागी करून घेतलं तर त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठीचा जो आपला एक प्रयत्न आहे त्याला कुठेतरी हातभार लावल्यासारखा होईल. आता या प्रशिक्षणानंतर जर कोल्हापूर जिल्ह्यामध्ये अशा पद्धतीची आपत्कालीन परिस्थिती येणाऱ्या पावसाळ्यामध्ये वगैरे निर्माण होते असं वाटलं, तर या दहा जणांच्या तृतीयपंथीयांच्या आपत्ती व्यवस्थापनाच्या टीम ला आम्ही आमच्या सोबत मदतीसाठी सोबत घेणार आहोत.**

## NDA

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी म्हणजे एनडीएच्या दीडशेव्या तुकडीचं दिमाखदार दीक्षांत संचलनाला आज पुण्यात प्रबोधिनीच्या खेत्रपाल मैदानावर सुरुवात झाली आहे. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी या संचलनाचं निरीक्षण करत आहेत. थोड्याच वेळात होणाऱ्या भारतीय हवाई दलाच्या नेत्रदीपक हवाई कसरती हे या सोहळ्याचं प्रमुख आकर्षण असेल.

दरम्यान एनडीएचा दीक्षांत समारंभ काल हबीबुल्ला सभागृहात दिमाखदार वातावरणात पार पडला. निवृत्त आयपीएस अधिकारी डॉ. किरण बेदी या समारंभाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी 236 कॅडेट्सना जवाहरलाल नेहरू विद्यापीठाची पदवी प्रदान करण्यात आली. बदलत्या जागतिक सुरक्षा परिस्थितीत 'स्कॉलर वॉरियर्स' म्हणून नेतृत्व करण्याचं आवाहन किरण बेदी यांनी कॅडेट्सना केलं. समारंभात एनडीएचे प्रभारी प्राचार्य डॉ. विनय दीप यांनी शैक्षणिक अहवाल सादर केला.

## चंद्रकांत पाटील

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम, ॲकेडेमिक बँक ऑफ क्रेडिट्स, इंटर्नशिप, भारतीय ज्ञान परंपरा तसंच कौशल्याधारित शिक्षणाची अंमलबजावणी सुरू आहे. या प्रक्रियेदरम्यान विविध बाबींमध्ये एकसमानता आणण्यासाठी विशेष कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे, अशी माहिती उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. या कृती दलाच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ. नितीन करमळकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विविध विद्यापीठांचे कुलगुरू, उच्च शिक्षण तंत्र शिक्षण संचालक आणि शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्यांचाही यात समावेश असल्याचं त्यांनी सांगितलं.

## पाऊस-IMD

यंदा जून ते सप्टेंबरच्या कालावधीत होणारा मोसमी पाऊस सरासरीच्या 90 टक्केच पडेल, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. यंदाच्या मान्सूनच्या दीर्घकालीन अंदाजाविषयी विभागाचे संचालक डॉ. मृत्युंजय मोहपात्रा यांनी काल नवी दिल्लीत माध्यमांना ही माहिती दिली. एल निनो परिस्थितीमुळे देशात यंदाचा नैऋत्य मान्सून दीर्घकालीन सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे असं त्यांनी सांगितलं. ईशान्येकडील राज्यांमध्ये सरासरी इतका पाऊस पडेल, तर देशाच्या मध्य आणि वायव्य भागात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता असल्याचं त्यांनी सांगितलं. जून महिन्यात उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाबसह अनेक राज्यांमध्ये उष्णतेची तीव्र लाट येण्याची शक्यताही हवामान विभागानं वर्तवली आहे.

## हवामान

येत्या 24 तासात कोकण आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी सोसाट्याचे वारे आणि वीजांसह पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**